


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०३ ● अंक : ०४७ ● पुणे ● बुधवार, दि. २९ ऑक्टोबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



प्रा. डॉ. संजय चोरडिया पुरस्काराने सन्मानित 3



रमेश गायकवाड यांचा वाढदिवस उत्साहात साजरा 4

## ठळक बातम्या




### टी-२० मालिकेला आजपासून सुरुवात

मुंबई (आरंभ पर्व) : भारत सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे. तीन सामन्यांची वनडे मालिका २५ ऑक्टोबर रोजी संपली. ही मालिका टीम इंडियाने २- १ अशी गमावली. वनडे मालिकेतील पराभवानंतर भारत सूर्यकुमारच्या नेतृत्वाखाली दमदार पुनरागमन करण्यासाठी सज्ज आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात ५ सामन्यांची टी-२० मालिकेला आजपासून सुरुवात होणार आहे. या मालिकेतील पहिला सामना २९ ऑक्टोबर रोजी कॅनबेरा येथे खेळला जाईल.सूर्यकुमार यादव या संघाचे नेतृत्व करेल. टीम इंडियाने ऑगस्ट २०२३ पासून एकही टी-२० मालिका हरलेली नाही. आता ऑस्ट्रेलियामध्ये ही विजयी मालिका कायम ठेवण्याची संधी भारताकडे असेल.



### मंत्री छगन भुजबळ रुग्णालयात दाखल

मुंबई (आरंभ पर्व) : राज्याच्या राजकारणातून मोठी बातमी हाती आली आहे. मंत्री छगन भुजबळ यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहेत. छातीत दुखत असल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आलंय. मुंबईतील जसलोक रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरु करण्यात आले आहेत. डॉक्टरांच्या पथकाकडून त्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जात आहे. भुजबळ यांच्या प्रकृतीची माहिती घेण्यासाठी राज्यातील अनेक नेते त्यांना संपर्क साधण्याचा प्रयत्न करत आहेत. भुजबळ यांचा अधिकृत वैद्यकीय अहवाल अद्याप हाती आलेली नाही.

# तरुणांची फसवणूक थांबवा!

## बनावट रोजगार ॲप्सवर राम शिंदेंचा कडक इशारा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील बेरोजगार तरुणांची रोजगार देण्याच्या आमिषाने बोगस ॲपच्या माध्यमातून होणारी फसवणूक ही अतिशय गंभीर बाब असून या संदर्भात दाखल होणाऱ्या तक्रारींची पोलीसांकडून तातडीने दखल घेण्यात यावी तसेच या संदर्भात येत्या 15 दिवसात अतिरिक्त मुख्य सचिव, गृह यांच्याकडे बैठक घेण्यात यावी, असे निर्देश महाराष्ट्र विधानपरिषद सभापती प्रा.राम शिंदे यांनी दिले. आज दिनांक 28 ऑक्टोबर, 2025 रोजी विधान भवन, मुंबई येथे त्यांच्या अध्यक्षतेखाली विधानपरिषद सदस्य ॲड. निरंजन डावखरे यांनी पावसाळी अधिवेशन-2025 मध्ये लक्षवेधी सूचनेद्वारे उपस्थित केलेल्या गैरव्यवहारासंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली, त्याप्रसंगी हा निर्णय घेण्यात आला.



> **अशा प्रकारच्या गुन्ह्यांना कडक प्रतिबंध व्हावा या दृष्टिने निश्चित उपाययोजना करणे आवश्यक असून या संदर्भात अतिरिक्त मुख्य सचिव, गृह यांनी 15 दिवसाच्या आत विधानपरिषद सदस्य ॲड. निरंजन डावखरे आणि सर्व संबंधितांची बैठक घ्यावी आणि निश्चित स्वरुपाची उपाययोजना करावी, असे निर्देश यावेळी विधानपरिष सभापती प्रा.राम शिंदे यांनी दिले.**

राष्ट्रीय कौशल्यविकास महामंडळाचे चिन्ह वापरुन असे बनावट ॲप तयार केले जातात. बेरोजगार तरुणांना नोकरीचे आमिष दाखवून त्यांच्याकडून या ॲपद्वारे पैसे उकळले जातात. काही दिवसांनी फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर संबंधित तरुण पोलीसात तक्रार दाखल करायला जातात त्यावेळी त्यांना ताटकळत ठेवले जाते, तक्रार दाखल करुन घेतली जात नाही. बनावट ॲप चालवणाऱ्या टोळ्या यांचे पोलीसांशी संगनमत असण्याची शक्यता आहे, असे मुद्दे यावेळी विधानपरिषद सदस्य ॲड. निरंजन डावखरे यांनी उपस्थित केले.

या महत्वाच्या बैठकीला राष्ट्रीय कौशल्यविकास महामंडळ व अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित न राहिल्याबद्दल यावेळी नाराजी व्यक्त करण्यात आली. गृह विभागाचे सह सचिव श्री. राहुल कुलकर्णी, पोलीस उप आयुक्त श्री.बजरंग बनसोडे, सायबर विभागाचे श्री. प्रविण बनगोसावी बैठकीस उपस्थित होते.

# ३ आयुक्त आणि १० डीएमसह ४६ अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्राप्रमाणे उत्तर प्रदेशातही प्रशासकीय यंत्रणेत बदल करण्यात येत आहेत. आज पुन्हा एकदा मोठ्या संख्येने आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. जवळपास ४६ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. काही अधिकाऱ्यांवर अतिरिक्त जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. तीन विभागीय आयुक्त आणि १० जिल्हा दंडाधिकाऱ्यांची बदली करण्यात आलीय. मिर्झापूर (विंध्याचल), सहारनपूर आणि मेरठच्या आयुक्तांची बदली करण्यात आलीय. हाथरस, सीतापूर, बस्ती, सिद्धार्थनगर, चित्रकूट, कौशांबी, बलरामपूर, ललितपूर, श्रावस्ती आणि रामपूर येथील जिल्हा दंडाधिकाऱ्यांचीही बदली करण्यात आलीय. वाराणसीच्या तैनात असलेल्या आयएएस अधिकाऱ्याच्या जबाबदाऱ्यांना बदलण्यात आल्या आहेत.मुख्य विकास अधिकारी, विकास प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, नगर आयुक्त आणि एडीएम




फायनान्सला देखील बदलण्यात आलेत. आतापर्यंत विंध्याचलच्या विभागीय आयुक्त असलेल्या बाल कृष्ण त्रिपाठी यांना सामान्य प्रशासन विभाग, उत्तर प्रदेश सरकारमध्ये सचिव बनवण्यात आले आहे.

मत्स्यव्यवसाय महासंचालक राजेश प्रकाश हे आता विंध्याचलचे विभागीय आयुक्त असणार आहेत. उत्तर प्रदेश राज्य मानवाधिकार आयोगाच्या सचिव श्रीमती धनलक्ष्मी के. यांची उत्तर प्रदेशच्या मत्स्यव्यवसाय महासंचालक म्हणून नियुक्ती करण्यात आलीय. महानिदेशक , सार्वजनिक उद्योग उत्तर प्रदेश संजय कुमार यांना अतिरिक्त जबाबदारी देण्यात आलीय. त्यांच्याकडे आता उत्तर प्रदेश राज्य मानवाधिकार आयोगाच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलाय. व्यवस्थापकीय संचालक, उत्तर प्रदेश राज्य विद्युत निर्मिती महामंडळ आणि उत्तर प्रदेश पॉवर ट्रान्समिशन कॉर्पोरेशन लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. रूपेश कुमार यांना आता सहारनपूरचे विभागीय आयुक्त म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.



# पाळीव प्राण्यांची घाण साफ करण्याची जबाबदारी मालकांचीच!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शहरातील गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये पाळीव प्राण्यांचे प्रमाण वाढले आहे. अनेकजण आपल्या कुत्रा-मांजरांना कुटुंबातील सदस्याप्रमाणे जपतात. मात्र काही वेळा या प्राण्यांनी केलेली घाण सार्वजनिक परिसरात तशीच राहिल्यामुळे इतर रहिवाशांमध्ये नाराजी निर्माण होते. या पार्श्वभूमीवर, सोसायटी परिसर स्वच्छ ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्राण्यांच्या मालकाचीच आहे, असा नियम स्पष्टपणे सांगितला जातो.

गेल्या काही वर्षांत अनेक सोसायट्यांनी पाळीव प्राण्यांवर कठोर नियम लागू केले आहेत. काही ठिकाणी खास ठराव करण्यात आला आहे की, जर कुत्रा किंवा इतर पाळीव प्राणी सोसायटीच्या परिसरात घाण करतो आणि ती मालकाकडून साफ केली गेली नाही, तर मालकावर दंड आकारला जाईल.

काही सोसायट्यांनी यासाठी ₹200 ते ₹500 पर्यंत दंड निश्चित केले आहेत. उद्देश एकच - परिसरातील स्वच्छता राखणे आणि इतर रहिवाशांना त्रास होऊ न देणे. Animal Welfare Board of India (AWBI) ने आपल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये म्हटले आहे की, पाळीव प्राणी ठेवण्यास मनाई करता येत नाही; मात्र सोसायटी परिसरात स्वच्छता राखण्याची जबाबदारी ही पूर्णपणे मालकाची आहे. प्राण्यांनी केलेली घाण साफ न केल्यास, सोसायटीला दंड आकारण्याचा अधिकार दिला जाऊ शकतो, कारण हा मुद्दा आरोग्य व सार्वजनिक स्वच्छतेशी संबंधित आहे.

● **सोसायटीकडून दंडाची तरतूद**

> ### काळजी आवश्यक
> **कुत्रे किंवा मांजरे फिरवताना त्यांच्यासाठी पिशवी किंवा साफसफाईचे साधन बाळगणे गरजेचे आहे. मुंबई, पुणे, ठाणे यांसारख्या महानगरांतील अनेक सोसायट्यांनी आता ‘Pet Zone’ किंवा ‘Pet Toilet Area’ तयार केली आहे, जेणेकरून घाण नियंत्रणात राहील.**

# आदित्य ठाकरेंचा गांधी पॅटर्न! भाजपचं 'पप्पू कार्ड'

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

फक्त वरळी मतदारसंघात 19 हजार 333 मतदारांबाबत घोळ असल्याचे पुरावेच आदित्य ठाकरेंनी उघड केलेत. त्यामुळे निवडणुक आयोग आणि सत्ताधाऱ्यांचं टेन्शन वाढलयं. मात्र ठाकरेसेनेचा हा निर्धार मेळावा आदित्य ठाकरेंच्या नेतृत्वाला बुस्टर देणारा ठरलाय. आदित्य ठाकरेंनी सत्ताधाऱ्यांसह निवडणुक आयोगावर कसे ताशेरे ओढलेत.

या सादरीकरणानंतर आदित्य ठाकरेंनी ठाकरेसेनेचं नेतृत्व आपल्या हाती घेण्याची जोरदार तयारी सुरू केल्याचं दिसतंय. खुद्द उद्धव ठाकरेंनीच आदित्य



ठाकरेंना सादरीकरणासाठी पुढे केल्यानं ठाकरेसेना आदित्य ठाकरेंना प्रोजेक्ट करत असल्याचं चित्र दिसलं. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदित्य ठाकरेंनी गांधी पॅटर्न राबवला असला तरी भाजपनं मात्र राहुल गांधींचाच दाखला देत आदित्य ठाकरेंची खिल्ली उडवलीय. तर ठाकरेसेनेनं मुख्यमंत्र्यांवर पलटवार केलाय. उद्धव ठाकरेंनंतर ठाकरेसेनेची धुरा अपेक्षेप्रमाणे आदित्य ठाकरेंकडेच येणार आहे. मात्र आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर व्होट चोरी मुद्याच्या माध्यमातून आदित्य ठाकरे आपल्या नेतृत्वाचा ठसा उमटवण्याचा प्रयत्न करत असल्याचं दिसंत...त्यामुळे य़ा निवडणुकीत ठाकरेसेनेच्या कामगिरीक़डे साऱ्या राज्याचं लक्ष लागलंय.

# ऑडिट की अजितदादा टार्गेट?

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांनी महायुतीबाबत सूचक वक्तव्य केल्यानंतर 24 तासांच्या आतच सरकारने पवार काका पुतण्यांची कोंडी केल्याची चर्चा रंगलीय..कारण सरकारनं साखर आयुक्त संजय कोलते यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन थेट वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या चौकशीचे आदेश दिलेत.. ही नियमित प्रक्रिया नाही तर भाजपने ठाण्यानंतर आपला मोर्चा बारामतीकडे वळवल्याचे संकेत आहेत, असा आरोप पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवारांनी केलाय.


वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट साखर उद्योगातील संशोधन आणि प्रशिक्षणाचं महत्वाचं केंद्र आहे. या संस्थेला दरवर्षी सरकारकडून 5 कोटींचं अनुदान दिलं जातं.. याबरोबरच ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून प्रतिटन 1 रुपयाचा निधीही दिला जातो. या



अनुदानाचा योग्य वापर होत नसल्याची शंका आल्याने मुख्यमंत्र्यांनी साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचे आदेश दिलेत..

आता हे प्रकरण चांगलंच तापलंय.. त्यातच महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंनी चौकशीच्या आदेशांना दुजोरा दिलाय.. मात्र या मुद्द्यावरुन गदारोळ झाल्यानंतर आता मुख्यमंत्र्यांनी चौकशीचे आदेश दिल्याचा दावा फेटाळून लावलाय..

सहकारी साखर कारखाने हे दोन्ही राष्ट्रवादीची शक्तीस्थानं... आता भाजपने राष्ट्रवादी आणि काँग्रेसच्या नेत्यांना आपल्याकडे वळवल्यानंतरही शरद पवार अध्यक्ष आणि अजित पवार संचालक असलेल्या वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या चौकशीच्या माध्यमातून भाजप पवारांच्या शक्तीस्थानावर अखेरचा घाव घालण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे...मात्र भाजपला कुबड्यांची गरज नसल्याचं शाहांनी विधान केल्यानंतर आता ज्या कुबड्यांच्या आधारावर सरकार उभं आहे त्यांना शक्तिहीन करून राज्यात केवळ भाजपचंच ट्रिपल इंजिन पळवण्याची तर रणनीती नाही ना असा सवाल यानिमित्तानं उपस्थित होतोय.



# डोनाल्ड ट्रम्प, नरेंद्र मोदी आणि एक ‘रिकामी खुर्ची’

क्वालालंपूरमध्ये कन्व्हेंशन सेंटरच्या झगमगत्या वातावरणात ईशान्य आशियातील नेते आपले बहुध्रुवीय भविष्य आखण्यासाठी एकत्र येत असताना एक ‘रिकामी खुर्ची’ बरेच काही सांगून गेली. जागतिक पटलावर भारताचा ठसा उमटविण्यासाठी या खंडातून त्या खंडात अथक भ्रमंती करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आसियान शिखर बैठकीत दूरदृश्य प्रणालीद्वारे आभासी भाषण दिले.

मोदींच्या या अनुपस्थितीने असंख्य वावड्या उठत आहेत. डोनाल्ड ट्रम्प नामक तोंडाळ बुलडोझर आशियाच्या अंगणात रोखण्याचा तर हा भारताचा प्रयत्न नाही? नवी दिल्लीच्या दृष्टिकोनातून मोदी यांची अनुपस्थिती दोघांची समोरासमोर भेट होऊ नये एवढ्यासाठी नसून एक हिशेबी खेळी आहे. वॉशिंग्टनबरोबर निर्माण झालेल्या आर्थिक तणावातून रशियाशी असलेले भारताचे नाते तणावाखाली आलेले आहे. आसियानमध्ये मोदींचे हे साहस त्यांच्या क्रियाशील विदेशी धोरणाचे प्रतीक होय. वर्ष २०१४ मध्ये पदग्रहण केल्यानंतर त्यांनी प्रत्येक आसियान इंडिया शिखर परिषदांना प्रत्यक्ष व आभासी हजेरी लावलेली आहे. मग आताच काय झाले?

नरेंद्र मोदी आणि डोनाल्ड ट्रम्प एकमेकांना टाळण्याचा ठराविक राजनैतिक खेळ खेळत आहेत असे दिसते. दोन्ही देश लोकशाही आणि मुक्त व्यापाराची पताका फडकवणारे देश असून, कोणाचीही प्रत्यक्षात एकमेकांना भिडण्याची तयारी नाही. क्वालालंपूर बैठकीला ट्रम्प उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे; तर मोदी यांनी आभासी सहभाग घ्यावयाचे ठरवले, यातूनच दोघांचे संबंध किती तणावात गेले आहेत, हे दिसते.

मलेशियाचे पंतप्रधान आणि अन्वर इब्राहिम हे शिखर बैठकीचे यजमान असून इंडोनेशिया, मलेशिया, सिंगापूर, थायलंड, व्हिएतनाम, फिलिपाइन्स, ब्रुनेई, कंबोडिया, लाओस आणि म्यानमार या दहा आशियाई सदस्य देशांचा हा महत्त्वाचा मंच आहे. भारत, चीन, जपान, ऑस्ट्रेलिया आणि अमेरिका हे त्यातील संवादात सहभागी होणारे भागीदार देश. दिवाळीनंतरचे कार्यक्रम आणि बिहारच्या निवडणुका हे कारण मोदींच्या अनुपस्थितीकरिता देण्यात आले असले, तरी ते सहज स्वीकारण्यासारखे नाही. ट्रम्प या शिखर बैठकीला येण्याची शक्यता असल्यामुळेच भारताने त्यांच्याशी ‘समोरासमोर भेट’ टाळल्याचे दिसते. मोदी




आणि ट्रम्प या उभयतांतील संबंध एकेकाळी अत्यंत सौहार्दाचे मानले जात होते; ते आता नाट्यपूर्णरीत्या बदलले आहेत. ट्रम्प यांच्या विचित्र शेरेबाजीने भारताला अडचणीत टाकले आहे. आपण भारत पाकिस्तानमधील युद्ध थांबवल्याची जाहीर शेखी ट्रम्प यांनी मिरवली. त्यावर दिल्लीची प्रतिक्रिया तीव्र होती. ‘रशियन तेल आयात आम्ही कमी करू’ असे मोदी यांनी आपल्याला खासगीत सांगितले आहे, असा दावा ट्रम्प यांनी केला. मात्र, भारतीय अधिकाऱ्यांनी त्याकडे ठरवून दुर्लक्ष केले. त्यातून तणाव आणखीच वाढला. ट्रम्प यांच्या आर्थिक नीतीने त्यात भरच घातली. दिल्ली आणि वॉशिंग्टनमधील समझौत्याच्या प्रयत्नांतून फारसे काही निष्पन्न झालेले नाही. या पार्श्वभूमीवर आसियान बैठकीला न जाऊन मोदी यांनी अनावश्यक राजनैतिक दिखावा टाळला आहे. त्यांच्या आभासी उपस्थितीने भारताचा आवाज नोंदवला गेला; पण तमाशा टळला.

असे असले तरी या भूमिकेमुळे पंतप्रधानांना व्यक्तिगत किंमत मोजावी लागणार आहे. मोदी यांची राजकीय ओळख विश्वास आणि जागतिक सर्वसाक्षीत्वावर उभारली गेलेली आहे. महत्त्वाच्या शिखर बैठकीला न जाण्याने भारताविषयी राजनैतिकदृष्ट्या महत्त्वाच्या बाबींवर प्रश्न उपस्थित होऊ शकतात. परराष्ट्र धोरणात उपस्थितीपेक्षा अनुपस्थिती जास्त बोलत असते. अपेक्षेप्रमाणे विरोधी पक्षांनी मोदी यांना लक्ष्य केले आहे. एकेकाळी मोदी हे जागतिक नेत्यांच्या खांद्याला खांदा लावून उभे राहत. आता ते त्यांना टाळत आहेत, असे विरोधक म्हणतात. ट्रम्प वारंवार अतिशयोक्तीपूर्ण बोलतात; त्यावर मोदी गप्प राहतात याचा अर्थ ते विदेशी दबावाला बळी पडत आहेत; जागतिक ठामपणा आणि बळकट राष्ट्रवादावर ज्यांनी आपली प्रतिमा उभी केली ते आता पळ काढत आहेत; असे चित्र त्यांना राजकीयदृष्ट्या महागात पडू शकते.

ट्रम्प यांच्या ‘दे दणादण’ शैलीमुळे मित्रपक्ष गडबडले असून, त्यांनी स्पर्धकांनाही भडकवले आहे. त्यांचा आर्थिक राष्ट्रवाद आणि देवघेवीची राजनीती यामुळे सहकार्याच्या जागी संघर्ष आला आहे. दुसरीकडे मोदी यांनी संयम आणि समतोल राखणे पसंत केले. दोघांचे परस्परविरोधी स्वभाव या जोडगोळीत सावध दुरावा उत्पन्न करताना दिसतात; दोन मोठ्या लोकशाही देशांच्या नेत्यांमध्ये दीर्घकाळ मौन चालू राहिले, तर ते जगाला परवडणारे नाही. जागतिक व्यापार, ऊर्जा सुरक्षा आणि प्रादेशिक स्थैर्य या गोष्टी वॉशिंग्टन आणि दिल्लीतील विश्वासार्ह समन्वयावरच अवलंबून आहेत. एक वेळ अशी येईलच जेव्हा मोदी यांना डावपेचात्मक शहाणपण बाजूला ठेवून ट्रम्प यांच्याशी उघडपणे दोन हात करावे लागतील. डिजिटल पडद्याच्या मागे राहून ते होणार नाही.

# ‘तू माझा किनारा’चा भावनिक प्रवास सुरू ३१ ऑक्टोबरपासून !

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गेल्या महिनाभरापासून प्रेक्षकांच्या उत्सुकतेच्या केंद्रस्थानी असलेला ‘तू माझा किनारा’ हा मराठी चित्रपट आता अखेर प्रेक्षकांसमोर येण्यासाठी सज्ज झाला आहे. या चित्रपटाची प्रदर्शन तारीख ३१ ऑक्टोबर २०२५ अशी जाहीर करण्यात आली आहे. वडील आणि मुलीच्या नात्याचा भावस्पर्शी प्रवास दाखवणाऱ्या या चित्रपटाचा ट्रेलर काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झाला होता आणि त्याला प्रेक्षकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. अनेकांनी सोशल मीडियावर या ट्रेलरचे कौतुक करत, कथेत दडलेले भावविश्व आणि अभिनयाची ताकद अधोरेखित केली आहे. आता सर्वांनाच या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहायची कारणं मिळाली आहेत.

‘तू माझा किनारा’ ही कथा आहे प्रत्येक वडिलांची, ज्यांना आपल्या मुलीबद्दल खूप सांगायचं असतं पण शब्द सापडत नाहीत आणि प्रत्येक मुलीची, जी आपल्या बाबांना समजून घ्यायचा प्रयत्न करत राहते. ही कथा आहे एका अशा कुटुंबाची, जे प्रेम, संघर्ष आणि समजुतीच्या दरम्यान स्वतःचा “किनारा” शोधतं. हा सिनेमा केवळ बाप लेकिच्या नात्याची कथा नाही, तर प्रत्येक घरात घडणारी गोष्ट आहे. आई वडील, मुलं, त्यांच्या भावना, छोट्या-छोट्या गोष्टींवरून होणारे वाद आणि न बोलता उमटणारे प्रेम, हे सगळं ‘तू माझा किनारा’च्या प्रत्येक क्षणात जाणवतं.



**चित्रपटाच्या संगीताची जादू उलगडली आहे क्रिस्टस स्टीफन आणि संतोष नायर यांनी, तर हृदयाला भिडणारी गाणी लिहिली आहेत समृध्दी पांडे यांनी. अभय जोधपूरकर, शरयू दाते, साईराम अय्यर, शर्वरी गोखले आणि अनिश मॅथ्यू यांच्या सुरेल आवाजाने या गीतांना जीव दिला आहे. जॉर्ज जोसेफ यांच्या पार्श्वसंगीताने प्रत्येक दृश्याला भावनिक साद मिळाली आहे.**

**चित्रपटामागे उभं आहे एक दमदार आणि अनुभवी पथक वेशभूषेत दर्शना चौधरी, रंगभूषेत सुनील सावंत आणि नृत्य दिग्दर्शनात सुनील साळे यांनी आपला खास ठसा उमटवला आहे. साऊंड डिझाइन आणि री-रेकॉर्डिंग मिक्सिंगचे कसब दाखवले आहे अभिजीत श्रीराम देव यांनी, तर डी आय कलरिस्ट भूषण दळवी आणि व्हिज्युअल फॉक्स स्टुडिओचे अभिषेक मोरे यांनी चित्रपटाला व्हिज्युअली आकर्षक रूप दिले आहे. जनसंपर्काची जबाबदारी सांभाळली आहे अमेय आंबेरकर (प्रथम ब्रँडिंग) यांनी, तर डिजिटल स्ट्रॅटजी मीडिया वन सोल्युशनने हाताळली आहे. आकर्षक पब्लिसिटी डिझाइन्ससाठी ब्रिजेश कल्याणजी देढिया, आणि व्हिज्युअल प्रमोशनसाठी नरेंद्र सोलंकी यांचे योगदान लक्षणीय आहे. विपुल सोनवणे (असोसिएट डायरेक्टर) आणि विशाल सुभाष नांदलजकर (मुख्य सहाय्यक दिग्दर्शक) यांच्या समन्वयाने आणि सम्मिट स्टुडिओच्या पोस्ट-प्रॉडक्शन ताकदीने हा चित्रपट अधिक प्रभावी बनला आहे. ‘तू माझा किनारा’ केवळ एक कथा नाही, तर एक कलात्मक अनुभव आहे, जिथे प्रत्येक फ्रेम, प्रत्येक सूर आणि प्रत्येक भाव तुमच्या मनाला भिडणार आहे!**

चित्रपटात भूषण प्रधान, केतकी नारायण आणि लहानगी केया इंगळे यांच्या भावनिक अभिनयाची मोहोर उमटलेली आहे. तिघांची पडद्यावरची केमिस्ट्री ही या चित्रपटाची सर्वात मोठी ताकद ठरणार आहे. अनुभवी कलाकार अरुण नलावडे आणि प्रणव रावराणे यांच्याही महत्त्वाच्या भूमिका या कथेला अधिक खोल रूप देणार आहेत.

यांच्यासोबतच जयराज नायर, सिमरन खेडकर, दीपाली मालकर, रेखा राणे हे कलाकार दिसणार आहेत.

लायन हार्ट प्रॉडक्शन प्रा. लि. प्रस्तुत या चित्रपटाची निर्मिती जॉइसी पॉल जॉय यांनी केली असून, सह-निर्माते सिबी जोसेफ आणि जॅकब जेव्हियर आहेत. कथा, पटकथा आणि दिग्दर्शन क्रिस्टस स्टीफन यांचे असून, त्यांनी बाप लेकिच्या नात्यातील सूक्ष्म भावना अत्यंत संवेदनशीलतेने उलगडल्या आहेत.

रूपांतरित पटकथा आणि संवाद चेतन किंजळकर यांनी लिहिले आहेत. चित्रपटाचं छायांकन एल्धो आयझॅक, संकलन सुबोध नारकर आणि कला दिग्दर्शन अनिल केदार यांनी उत्कृष्टरीत्या साकारलं आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### वैराग पोलीस स्टेशनतर्फे ग्राम सुरक्षा दलाच्या जवानांना टी-शर्ट वाटप

**बार्शी (आरंभ पर्व) : वैराग (ता. बार्शी) येथील वैराग पोलीस स्टेशन तर्फे ग्राम सुरक्षा दलाच्या जवानांना टी-शर्टचे वाटप करण्यात आले. ग्रामीण भागात नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अखंड सेवा देणाऱ्या ग्राम सुरक्षा दलाच्या जवानांचा सन्मान आणि प्रोत्साहन म्हणून हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमात सारोळे येथील ग्राम सुरक्षा दलाच्या जवानांना वैराग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक (PI) कुंदन गावडे साहेब यांच्या हस्ते टी-शर्ट वाटप करण्यात आले. गावाच्या सुरक्षेसाठी हे जवान सतत तत्पर राहतात, त्यांचे मनोबल वाढवण्यासाठी पोलिस प्रशासनाने पुढाकार घेतला. यावेळी प्रमुख उपस्थित म्हणून विजय महापुरे, चंद्रकांत साबळे, विश्वजीत साबळे, प्रमोद भोसले, हनुमंत जाधव, लक्ष्मण ठोंबरे, नितीन गायकवाड, ज्योतीराम जगताप, तसेच पोलीस पाटील अण्णासाहेब साबळे आणि सारोळे गावचे माजी सरपंच बाळराजे गाटे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन ग्राम सुरक्षा दलाच्या सदस्यांच्या सहभागातून करण्यात आले. गावाच्या सुरक्षेसाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या जवानांच्या कार्याचे पोलीस प्रशासनाकडून कौतुक करण्यात आले. PI कुंदन गावडे यांनी यावेळी सांगितले, “ग्राम सुरक्षा दल हे पोलिस प्रशासनाचे हात आणि डोळे आहेत. ग्रामीण भागात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात या दलाचे योगदान अतुलनीय आहे.” कार्यक्रमानंतर उपस्थित ग्रामसुरक्षा दलाच्या जवानांनी पोलीस प्रशासनाचे आभार मानले आणि गावाच्या सुरक्षेसाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.**



### कष्टकरी व आदिवासी महिलांना साडीचोळीची भाऊबीज भेट

**• अंबाईमाता देवस्थानचा उपक्रम**

**पुणे (आरंभ पर्व) : धायरी येथील शिवकालीन श्री अंबाईमाता देवस्थानच्या वतीने दिवाळी निमित्त धायरी व खडकवासला परिसरातील अडीचशे कष्टकरी सफाई व घरगुती कामगार महिलांना तसेच सिंहगड-निगडे मोसे भागातील आदिवासी कातकरी व गरजू महिलांना साडीचोळीची भाऊबीज भेट देऊन सन्मानित करण्यात आले. धायरी येथे झालेल्या कार्यक्रमात देवस्थानचे अध्यक्ष श्रीरंग चव्हाण पाटील व नांदेडसिटी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल भोस यांच्या हस्ते साडीचोळींचे वाटप करण्यात आले. तर सिंहगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या निगडे मोसे येथील ऐतिहासिक शिवशंभू शिल्प सृष्टी येथे श्रीरंग चव्हाण पाटील, शंकरराव दांगट व रघुनाथ यादव यांच्या हस्ते साडीचोळींची भाऊबीज भेट देण्यात आली. यावेळी बोलताना श्रीरंग चव्हाण पाटील म्हणाले, “देवस्थानच्या वतीने गेल्या वीस वर्षांपासून भाऊबीजेच्या दिवशी कष्टकरी व गरजू महिलांना साडीचोळीची भेट देण्याची परंपरा आम्ही जोपासत आहोत. समाजातील या घटकांना आनंद व आपुलकीचा संदेश देणे हे आमचे कर्तव्य आहे.” कार्यक्रमाच्या वेळी काकासाहेब चव्हाण, जयश्री पोकळे, गुलाबराव पोकळे, संदीप पोकळे, धनंजय बेनकर, चंद्रकांत वांजळे, भाऊसाहेब कामठे, सोपान लायगुडे, हिरामण पोकळे, बाळासाहेब कामठे, सोमनाथ भोसले, सागर पोकळे, किरण पोकळे, बाजीराव चौधरी, संदीप चव्हाण, नामदेव भुरुक, निलेश दमिष्टे, सनी रायकर आदी मान्यवर उपस्थित होते.**

### ९ वर्षीय बालकावर बिबट्याचा हल्ला

**राजगुरूनगर (आरंभ पर्व) : रेटवडी (ता. खेड) येथे वडिलांबरोबर शेतात गेलेल्या नऊ वर्षीय शाळकरी मुलावर बिबट्याने हल्ला केला. परंतु, वडिलांच्या प्रसंगावधानामुळे मुलाचा जीव वाचला. या घटनेमुळे स्थानिक ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वन विभागाकडून बिबट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी करण्यात आली आहे. रेटवडी येथील सतारकावस्ती, कोल्हेवस्ती या परिसरात गेल्या चार महिन्यांपासून तीन ते चार बिबट्याचा वावर आहे. गुरुवारी (दि. २३) दुपारी स्वराज दत्तात्रय जाधव हा वडिलांबरोबर शेतात फुले तोडण्यासाठी गेला होता. त्यावेळी शेतात दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्याच्यावर हल्ला केला. त्याच्या वडिलांनी प्रसंगावधान राखून शेतीकामाच्या फावड्याने बिबट्यावर प्रतिहल्ला करत बिबट्याच्या तावडीतुन मुलाला सोडवले. स्वराजच्या गळ्यावर, मानेवर खोलवर गंभीर जखमा झाल्या आहेत. त्याला तात्काळ चांडोली येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. त्यानंतर त्यास पिंपरी चिंचवडमधील वायसीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले.**

# खासदार क्रीडा महोत्सवाच्या 'अजिंक्य' मॅस्कॉटचे अनावरण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या पहिल्या खासदार क्रीडा महोत्सवाच्या 'मॅस्कॉट'चे अनावरण नुकतेच करण्यात आले. या मॅस्कॉटचे नाव 'अजिंक्य' असे आहे. अर्जुन पुरस्कार विजेते ऑलिम्पिकपटू मनोज पिंगळे, शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या मोहिनी चाफेकर व स्पर्धेचे मुख्य समन्वयक, शिवछत्रपती पुरस्कार विजेते मनोज एरंडे, आशियाई स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या ऋतुजा भोसले आदी उपस्थित होते. ‘फिट युवा फॉर विकसित भारत’ या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत, केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकारातून पहिला 'खासदार क्रीडा महोत्सव' येत्या २ नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबर २०२५ दरम्यान पार पडणार आहे. या १५ दिवसीय महोत्सवात शहरातील विविध मैदानांवर एकूण ३७ प्रकारच्या क्रीडा स्पर्धा होणार आहे. मनोज एरंडे म्हणाले, "भारतीय पारंपरिक आणि ऑलिम्पिकमधील खेळांचा यात समावेश आहे. सांघिक व एकेरी प्रकारात या स्पर्धा होणार आहेत. आर्चरी, ॲथलेटिक्स, बॅडमिंटन, स्विमिंग, बास्केटबॉल, बॉडी बिल्डिंग, बॉक्सिंग, कॅरम, बुद्धिबळ, सायकलिंग, क्रिकेट, फुटबॉल, जिम्नॅस्टिक्स, हॉकी, ज्युदो, कबड्डी, खो-खो, मल्लखांब, पिकलबॉल, रोलबॉल, शूटिंग, स्केटिंग, सॉफ्टबॉल, टेबल टेनिस, तायक्वांदो, टेनिस, व्हॉलीबॉल, वॉल क्लायम्बिंग, वॉटर पोलो, वेट लिफ्टिंग, कुस्ती, वुशू, योग, स्क्वॅश यांसारख्या विविध स्पर्धांचा समावेश आहे. दिव्यांगांसाठी विशेष ॲथलेटिक्स व ज्येष्ठांसाठी कॅरम स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. अधिक माहितीसाठी मनोज एरंडे (९८२२०४५१०१) यांच्याशी संपर्क साधावा.



# “शताब्दी संघ यात्रा” नाटकाने प्रेक्षकांना केले प्रेरित!

## देशाला नॉन-क्राफ्ट प्रधानमंत्री देणारा संघ – दिग्दर्शक संजय पेंडसे यांचे मत





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त सादर करण्यात आलेले द्विअंकी हिंदी नाटक “शताब्दी संघ यात्रा” प्रेक्षकांच्या मोठ्या उत्साहात आणि टाळ्यांच्या गजरात पार पडले. “संघ गंगा के तीन भगीरथ” या संकल्पनेवर आधारित या नाटकाने संघाच्या तीन महानायकोंच्या कार्याचा प्रभावी पट मांडत उपस्थितांना प्रेरणादायी अनुभव दिला.

या नाटकाद्वारे संघाचे संस्थापक डॉ. केशव बलिराम हेडगेवार, विचारविस्तारक मा. श्री गुरुजी (माधव सदाशिव गोलवलकर) आणि संघाला दृष्टि व अनुशासन देणारे बालासाहेब देवरस — या त्रयींचा राष्ट्रनिर्मितीचा प्रवास भावपूर्ण पद्धतीने साकारण्यात आला. नाटकाच्या प्रत्येक प्रसंगात संघाची तत्त्वनिष्ठा, त्याग, संघटनशक्ती आणि देशभक्तीची जाणीव जागवण्यात आली.

नाटकाचे दिग्दर्शक संजय पेंडसे यांनी सांगितले, “डॉ. हेडगेवार यांनी संघाची स्थापना केली, गुरुजींनी त्याचा विस्तार केला आणि बालासाहेब देवरस यांनी संघाला अनुशासन व दृष्टि दिली. हाच संघ देशाला नॉन-क्राफ्ट प्रधानमंत्री देणारा ठरला, हे संघाच्या विचारशक्तीचे प्रतिक आहे.” त्यांच्या या वक्तव्याला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

नाटकाचे मार्गदर्शन रविंद्र भुसारी यांनी केले असून, लेखन श्रीधर गाडगे, नेपथ्य सतीश पेंडसे, निर्मिती सारिका पेंडसे, आणि संगीत दिग्दर्शन डॉ. भाग्यश्री चिटणीस यांचे आहे. प्रभावी संवाद, भावस्पर्शी संगीत आणि उत्कंठावर्धक सादरीकरणामुळे प्रेक्षकांच्या मनात राष्ट्रभावना आणि संघटनशक्तीची नवी ज्योत प्रज्वलित झाली.

“शताब्दी संघ यात्रा” हे नाटक केवळ संघाच्या इतिहासाचे चित्रण नसून, ती एका राष्ट्रनिर्मितीच्या प्रवासाची कथा आहे. प्रेक्षकांनी नाटकातील संवादांवर अनेकदा टाळ्यांचा कडकडाट करून आपला प्रतिसाद नोंदवला.

संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त साकारलेले हे नाटक प्रेक्षकांच्या मनावर कायमची छाप सोडून गेले असून, राज्यभरातील विविध शहरांमध्ये लवकरच या नाटकाची पुढील सादरीकरणे आयोजित करण्यात येणार आहेत.

# जागतिक इंटरनेट दिन

**• श्याम ठाणेदार •**
**दौंड जिल्हा, पुणे**

**(दै. आरंभ पर्व)**

आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट आज सर्वांच्या जीवनातील अविभाज्य घटक बनला आहे. इंटरनेट शिवाय कोणी राहू शकत नाही एकवेळ माणूस अन्नापाण्याशिवाय राहील पण इंटरनेटशिवाय नाही इतकी इंटरनेट आज जीवनावश्यक गोष्ट बनली आहे. आपला इंटरनेट पॅक अचानक संपला तर आपली काय अवस्था होते हे तपासून पहा. असं कोणतेच क्षेत्र नाही जिथे इंटरनेटचा वापर होत नाही सर्वच क्षेत्रात इंटरनेटचा वापर केला जातो म्हणूनच इंटरनेट आपल्या जीवनातील अविभाज्य भाग बनला आहे. भारतात १९९५ च्या सुमारास इंटरनेट उपलब्ध झालं मात्र असलं तरी त्याच्या कितीतरी आधी अमेरिकेत आणि युरोपात इंटरनेटचा वापर केला जात होता. २९ ऑक्टोबर १९६९ रोजी इंटरनेटवरचा पहिला संदेश पाठवला गेला म्हणूनच २९ ऑक्टोबर हा दिवस जागतिक इंटरनेट दिवस म्हणून मानला जातो . इंटरनेटवर पहिला संदेश पाठवला त्याला आज बरोबर ५६ वर्ष पूर्ण झाली. या ५६ वर्षात इंटरनेटमुळे जगात अनेक क्रांतिकारी बदल झाले मात्र इंटरनेटवर पहिला संदेश कसा पाठवला गेला हे पाहणे खूप मनोरंजक आहे. १९६० चा दशकात अमेरिका आणि रशिया यांच्यात शीतयुद्ध चालू होते अमेरिकन सैन्याला इंटरनेट व्यवस्था सारखी गुप्त व्यवस्था संदेशवहनासाठी हवी होती. अशी यंत्रणा स्थापन करण्यासाठी अमेरिकन संरक्षण खात्याने एका संशोधन प्रकल्पाला मोठ अर्थसहाय्य देऊन अमेरिकेतील काही विद्यापीठाकडे त्या संशोधनाचे काम सोपवल. या प्रकल्पासाठी एकूण चार संगणक अमेरिकेतील चार विद्यापीठात जोडण्यात आले.

त्या चार संगणकातच जगातील पहिलं इंटरनेट होत. या चार संगणकांपैकी एक होता कोलिफॉर्निया लॉस एंजेलिस विद्यापीठात, दुसरा होता स्टॅनफोर्ड विद्यापीठात तिसरा होता सांता बार्बरा विद्यापीठात तर चौथा होता उता विद्यापीठात. एका संगणकातून दिला जाणारा संदेश इंटरनेटद्वारे दुसऱ्या संगणकात पोहचतो असे संशोधन



या प्रकल्पातील तज्ज्ञांनी केले होते त्याची चाचणी या चार संगणकाद्वारे केली जाणार होती. अर्थात त्याकाळी आजच्या इतके प्रगत तंत्रज्ञान नव्हते. संगणकाचे मॉनिटर तर हिरव्याजर्द अक्षरांनी चमकणारे असत. कॉलिफॉर्नियामध्ये चार्ली क्लीने या संगणकप्रणाली निर्मात्याने एका संगणकावरून दुसऱ्या संगणकाला एकेक्ट्रोनिक संदेश पाठवला. पहिल्या वेळी पाठवलेल्या log in शब्दापैकी lo शब्द पोहचल्यावर सिस्टीम फेल झाली. पुढील अक्षरे पोहचू शकली नाहीत मात्र अर्धवट का होईना संदेश पोहचला ही बाब दूरसंचार आणि तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती घडवणारी ठरली. हा दिवस माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सुवर्ण दिन ठरला. म्हणूनच २९ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक इंटरनेटदिन म्हणून साजरा केला जातो.







# प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया 'आरंभ रत्न' पुरस्काराने सन्मानित

## शिक्षण, सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल 'आरंभ रत्न पुरस्कार' प्रदान



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि नवउद्यमशीलतेच्या माध्यमातून समाजात उल्लेखनीय योगदान देणारे सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांना दैनिक आरंभपर्वतर्फे पहिला 'आरंभरत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ पत्रकार विश्वास आरोटे, 'आरंभ पर्व'च्या मुख्य संपादिका सुरेखा सावंत, संपादक प्रतीक गंगणे आदी उपस्थित होते.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर प्रा. डॉ. संजय चोरडिया म्हणाले, "शिक्षण हे केवळ ज्ञान देण्याचे माध्यम नसून, व्यक्तिमत्त्व घडविण्याची शक्ती आहे. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची, राष्ट्राप्रती प्रेम भावाची आणि उद्यमशीलतेची जाणीव निर्माण करण्यावर, तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासावर सूर्यदत्त संस्थेने आरंभापासून भर दिला आहे. 'आरंभ पर्व'सारख्या माध्यमांनी ग्रामीण भागातील प्रतिभेला आणि सामाजिक कार्यकर्त्यांना व्यासपीठ देण्याचे केलेले काम अत्यंत प्रेरणादायी आहे."

या कार्यक्रमाला भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तृप्ती देसाई, जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संस्थापक सुधाकरराव जाधवर, उद्योजक व दानशूर व्यक्तिमत्व नानजीभाई ठक्कर, तसेच स्विफ्ट डिटेक्टिव अँड इन्व्हेस्टिगेशनच्या संचालिका प्रिया काकडे या मान्यवरांनी उपस्थित राहून विविध पुरस्कार्थ्यांचा सन्मान केला. प्रसंगी प्रसिद्ध अभिनेत्री आणि मॉडेल मयुरी नव्हाते, तसेच अभिनेता व युवा उद्योजक ओम यादव, माजी उपमहापौर ॲड. प्रसन्न जगताप, काकासाहेब चव्हाण, भूपेंद्र मोरे, बाप्पूसाहेब पोकळे, रूपेश घुले आदी उपस्थित होते.

मान्यवरांनी प्रेरणादायी मनोगत व्यक्त करत उपस्थितांना प्रोत्साहित केले. तसेच पुरस्कारार्थींच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. प्रतीक गंगणे यांनी प्रास्ताविक केले. सुरेखा मते यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन निवासी संपादक लक्ष्मण साबळे, मार्केटिंग हेड अभिषेक मरगळे, आणि पुणे शहर पत्रकार महेश वरवटे यांनी केले. राज शिनारे यांनी सूत्रसंचालन केले.

## डॉ. शीतल हरपळे यांना रायझिंग क्लिनिशियन ॲवॉर्ड प्रदान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नोबल हॉस्पिटल्स अँड रिसर्च सेंटर येथील मानसिक आरोग्य चिकित्सक डॉ.शीतल हरपळे यांना पोर्टलँड,ओरेगॉन, युएसए येथे द अमेरिकन आर्ट थेरपी असोसिएशन (एएटीए) तर्फे नुकत्याच संपन्न झालेल्या 56 व्या वार्षिक परिषदेत रायझिंग क्लिनिशियन ॲवॉर्ड 2025 ने सन्मानित करण्यात आले.हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त करणाऱ्या डॉ.हरपळे या पहिल्या भारतीय आर्ट थेरपीस्ट असून भारतातील आर्ट थेरपी विषयाचे वाढते महत्त्व अधोरेखित करते.



रायझिंग क्लिनिशियन ॲवॉर्ड हा पुरस्कार अभिनवता,विषयाची सखोलता आणि लोकांवर प्रभाव दर्शविणाऱ्या चिकित्सकांना प्रदान करण्यात येतो. डॉ.हरपळे यांना देण्यात आलेल्या पुरस्काराच्या फलकावर 'सर्व्हज् ॲज अ मॉडेल ऑफ एक्सलन्स इन आर्ट थेरपी' असे लिहिले गेले असून सर्जनशील आणि प्रतिसादात्मक उपचारात्मक पध्दतींद्वारे मानसिक आरोग्याप्रती त्यांच्या समर्पित प्रयत्नांची दखल घेतो.

## स्थानिक स्वराज्य संस्था स्वबळावर लढवणार : जिल्हाध्यक्ष उमेश पाटील

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

बार्शी तालुक्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्वबळावर लढवणार असल्याचे संकेत जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी दिले आहेत. पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत बोलताना त्यांनी संकेत दिले आहेत.

बैठकीदरम्यान जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी सांगितले की, "राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संघटन मजबूत असून, आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पक्षाचे जास्तीत जास्त लोकप्रतिनिधी निवडून यावेत यासाठी सर्वांनी एकदिलाने प्रयत्न करावेत."

ते पुढे म्हणाले की, पक्षाने घेतलेला हा निर्णय कार्यकर्त्यांच्या आत्मविश्वासात भर घालणारा आहे आणि स्थानिक पातळीवर जनतेचा विश्वास जिंकण्याचा निर्धार पक्षाने केला आहे.




बैठकीस जिल्हा सरचिटणीस नागेश चव्हाण, तालुकाध्यक्ष बापूसाहेब चौबे, विक्रम साळवे सर, पदवीधर जिल्हा सरचिटणीस प्रमोद कापसे, सामाजिक व न्याय विभाग जिल्हाध्यक्ष प्रशांत बालशंकर (बार्शी), ओबीसी सेल तालुका अध्यक्ष सुनील जाडकर, युवक शहर जिल्हा उपाध्यक्ष अमोल बदे, युवक जिल्हा उपाध्यक्ष समाधान पवार, युवा जिल्हा सरचिटणीस,नवाज मुलानी, तसेच युवक शहराध्यक्ष मुज्वील पठाण यांच्यासह अनेक पदाधिकारी, उपस्थित होते. बैठकीदरम्यान पक्षाच्या संघटनात्मक बांधणी, आगामी निवडणूक नियोजन यासंबंधी सर्वांनी लक्ष घालून काम करावे असे आदेश यावेळी पाटील यांनी दिले. त्यामुळे बार्शी तालुका पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणूक मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस काय कामगिरी करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## लोककलांच्या जतन संवर्धनासाठी समिती स्थापन करावी

**महेश वरवटे**

- **उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे**

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील लोककला, लोकसंस्कृती आणि पारंपरिक कलांच्या जतन व संवर्धनासाठी समिती स्थापन करावी, अशी सूचना महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली. विधानभवनात लोककलावंतांच्या समस्या, आव्हाने आणि उपाययोजना" या विषयावर आढावा बैठक घेण्यात आली. या



बैठकीला सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्री. चौरे, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर, लोककला अभ्यासक प्रा. डॉ. प्रकाश खांडगे, सुशांत शेलार, लोककलावंत नंदेश उमप, डॉ. भावार्थ देखणे आणि खंडूराज गायकवाड उपस्थित होते. डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, "महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवात विविध लोककला हा अमूल्य वारसा आहे.

मात्र, या कलांना आधुनिक काळात आवश्यक ते प्रोत्साहन आणि संरक्षण मिळणे गरजेचे आहे." त्यांनी पुढे सांगितले की, सांस्कृतिक विभागाने लोककलांसाठी स्वतंत्र समिती स्थापन करावी. या समितीमार्फत लोककलांचे सहंतीकरण, संकलन, तसेच लोककलांसाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तूंचे संग्रहालय स्थापनेचे काम हाती घेता येईल. तसेच विविध लोककला महोत्सव राज्यभरात व्यापक स्वरूपात आयोजित करण्याचे नियोजनही या समितीमार्फत करता येईल.




### शब्दसुरांच्या साथीने तीन भारतरत्नांना सांगीतिक अभिवादन; मराठवाड्यातील पूरग्रस्त विद्यार्थ्यांसाठी निधी संकलन

# विद्यार्थी सहायक समितीची एकही केस फेल नाही : जीवराज चोले

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"विद्यार्थी सहायक समितीची एकही केस फेल झालेली नाही," असे अभिमानाने सांगताना रोटरी क्लब ऑफ पुणे सनराईजचे अध्यक्ष आणि विद्यार्थी सहायक समितीचे माजी विद्यार्थी जीवराज चोले यांनी समितीच्या यशस्वी कार्याचा गौरव केला.



विद्यार्थी सहायक समितीने अनेक वर्षांपासून गरजू आणि हुशार विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच स्वावलंबनाचे धडे दिले आहेत. समितीतून घडलेले विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी करत आहेत. "समितीतील प्रत्येक विद्यार्थी यशस्वी ठरत असून समाजात आपले स्थान निर्माण करत आहे," असे चोले यांनी सांगितले.

रोटरी क्लबच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळताना जीवराज चोले सामाजिक कार्यातही सक्रिय आहेत. शिक्षण, स्वावलंबन आणि समाजसेवा या तिन्ही आघाड्यांवर त्यांनी आदर्श निर्माण केला आहे. समितीच्या कार्यामुळे गरीब विद्यार्थ्यांना केवळ शिक्षणाची संधी मिळत नाही, तर आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण विकसित होतात, असे मतही त्यांनी व्यक्त केले.

याच निमित्ताने रोटरी क्लब ऑफ पुणे सनराईजतर्फे मराठवाड्यातील पूरग्रस्त विद्यार्थ्यांसाठी सहाय्यता निधी उभारण्यासाठी 'तीन भारतरत्न' या सांगीतिक मैफलीचे आयोजन करण्यात आले. फर्ग्युसन रोडवरील विद्यार्थी सहाय्यक समितीच्या मोडक सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात भारतरत्न पं. भीमसेन जोशी, गानसम्राज्ञी लता मंगेशकर आणि कवी अटल बिहारी वाजपेयी यांच्या गाणी, कविता आणि आठवणींचा त्रिवेणी संगम रसिकांनी अनुभवला.

गायिका मनीषा निश्चल, गायक अमोल निसळ आणि संजीव मेहेंदळे यांच्या बहारदार सादरीकरणाने सभागृहात रंगत आणली. मनीष आपटे यांच्या ओघवत्या निवेदनाने मैफलीचा आनंद द्विगुणित झाला. विवेक परांजपे (सिंथेसायजर), यश भंडारे (कीबोर्ड), अमेय ठाकूरदेसाई (तबला), अनिल करंजवकर (पखवाज) आणि चेतन परब (ऑक्टोपड) यांनी पूरक साथसंगत केली.

गायिका मनीषा निश्चल यांनी ज्योतिकलश झलके, अपने ही मन से कुछ मांगे, राम का गुणगान करिये, मेंदीच्या पानावर, दिल हुम हुम करे ही गीते सादर केली; तर संजीव मेहेंदळे यांनी वंदिन अयोध्येचा राजा, भाग्यदा लक्ष्मी बारम्मा, भेटीलागी जीवा या रचना सादर केल्या. अमोल निसळ यांनी आता कोठे धावे मन, तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल, राजस सुकुमार मदनाचा पुतळा ही गीते गाऊन रसिकांची मनं जिंकली.

या कार्यक्रमात सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, *दिव्यांग इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज (डिकाई)*चे रघुनाथ येमुल गुरुजी, विद्यार्थी सहाय्यक समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, रोटरी क्लबचे सचिव तेजस्विनी थिटे उपस्थित होते.

या प्रसंगी रोटरी क्लब ऑफ पुणे सनराईजच्या वतीने जीवराज चोले यांनी मराठवाड्यातील पूरग्रस्त विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी १ लाख ५१ हजार रुपयांचा निधी समितीला प्रदान केल्याची घोषणा केली.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "विद्यार्थी सहाय्यक समितीचे कार्य हे नैतिक आणि मूल्याधिष्ठित आहे. जिथे कमी आहे, तिथे 'सूर्यदत्त' आहे, असे आम्ही समजतो."

तर तुषार रंजनकर म्हणाले, "समितीतील निम्मे विद्यार्थी मराठवाड्यातील आहेत. विद्यार्थ्यांसाठी 'कमवा आणि शिका' योजना राबविली जाते. कौशल्यविकास, सर्वांगीण प्रगती आणि जबाबदार नागरिक घडविणे हेच समितीचे ध्येय आहे."




## थोडक्यात पण महत्वाचे



### आठवणींच्या गावाला घेऊन जाणारा 'गावगाथा' दिवाळी अंक : पवार

पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेच्या कार्यालयात संस्थेचे अध्यक्ष मा. उल्हासदादा पवार यांच्या हस्ते "गावगाथा दिवाळी अंक" चे प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला. या प्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक व भाषा अभ्यासक प्रा. माधव राजगुरू, कार्याध्यक्ष डॉ. नीला बोर्वणकर आणि सचिव रविकिरण गळंगे उपस्थित होते. प्रकाशनानंतर बोलताना मा. उल्हासदादा पवार म्हणाले की, गावगाथा दिवाळी अंक वाचकांना त्यांच्या आठवणींच्या गावात घेऊन जाणारा, ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडवणारा आणि आपल्या मातीच्या नात्यांची जाणीव करून देणारा आहे. त्यांनी अंकाचे मुखपृष्ठ अतिशय सुंदर व भावपूर्ण झाल्याचे सांगून संपादकांचे अभिनंदन केले. त्यांनी पुढे सांगितले की, दिवाळी अंक काढणे ही सोपी गोष्ट नाही; हे अतिशय खर्चीक आणि परिश्रमाचे काम आहे. तरीसुद्धा महाराष्ट्रात ही दिवाळी अंकांची परंपरा आजही जपली जाते, ही अभिमानाची बाब आहे. यावेळी प्रा. माधव राजगुरू यांनी गावगाथा दिवाळी अंकाचे संपादक धोंडपा नंदे यांच्या साहित्यप्रेमाची आणि जिद्दीची प्रशंसा केली. ते पुण्यात सायकलवरून प्रवास करत वाचकांपर्यंत अंक पोहोचवतात, ही त्यांची समर्पित वृत्ती खरोखर प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी गावगाथा दिवाळी अंकाच्या यशस्वीतेस शुभेच्छा देत वाचकांनी हा अंक विकत घेऊन वाचावा, असे आवाहन केले.

### प्रभागरचना स्पष्ट झाल्यानंतर, आरक्षण सोडत कधी जाहीर होणार?

पुणे (आरंभ पर्व) : पुणे महानगरपालिकेच्या (PMC) आगामी निवडणुकांचा मार्ग आता स्पष्ट झाला आहे. राज्यातील प्रभाग रचना स्पष्ट झाल्यानंतर, आता सर्वात महत्त्वाच्या टप्पा म्हणजे आरक्षण सोडत कधी होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. निवडणूक विभागाने अधिकृतपणे जाहीर केले आहे की, ही सोडत 11 नोव्हेंबर रोजी होणार आहे. यामुळे निवडणुकीच्या तयारीला आता वेग येणार आहे. पुण्यातील एकूण 41 प्रभागांच्या सोडतीवरच सर्वकाही अवलंबून आहे. या प्रक्रियेत, महिला उमेदवारांसाठी, तसेच अनुसूचित जाती/जमाती (SC/ST) आणि इतर मागासवर्गीय (OBC) घटकांसाठी जागा निश्चित केल्या जातील. कोणत्या प्रभागाचे आरक्षण कोणत्या श्रेणीत जाईल, हे जाहीर होताच राजकीय पक्षांना त्यांच्या उमेदवारीच्या योजना ठरवता येतील. विशिष्ट समाजातील उमेदवारांना कोणत्या भागात संधी द्यायची, याबद्दलचे प्राथमिक आराखडे यामुळे स्पष्ट होतील. निवडणूक अधिकारी प्रसाद काटकर यांनी सांगितले आहे की, आरक्षण सोडत घेण्यासाठी लागणारी सर्व तांत्रिक तयारी आणि प्रशासकीय कामांची पूर्तता झाली आहे. दरम्यान, ही संपूर्ण सोडत प्रक्रिया पुणे महापालिकेच्या सभागृहात आयोजित केली जाणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे




### अली दारूवाला यांचा वन इंडिया पुरस्काराने गौरव

पुणे (आरंभ पर्व) : भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय प्रवक्ते अली दारूवाला यांना नुकताच वन इंडिया अ‍ॅवॉर्ड 2025 प्रदान करण्यात आला. माय होम इंडिया या संस्थेच्या वतीने दिला जाणारा वन इंडिया अ‍ॅवॉर्ड 2025 हा पुरस्कार एका विशेष सोहळ्यात केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.मुंबईतील दादर येथील वीर सावरकर सभागृहात पार पडलेल्या या सोहळ्यात तेलंगणाचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा ,राज्याचे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री अ‍ॅड.आशिष शेलार, आंध्र प्रदेश भाजपा चे सह-प्रभारी सुनिल देवधर,महाराष्ट्राचे आरएसएस प्रांत प्रचारक मिलिंद मराठे आदी मान्यवर उपस्थित होते. अली दारूवाला हे 2010 पासून आरएसएसमध्ये आणि 2019 पासून भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते म्हणून काम पाहत आहेत. समाजासाठी अथक योगदान आणि अल्पसंख्यांक समुदायाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केलेल्या प्रयत्नांसाठी या पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले.



### चेन्नई ओपन २०२५ ला बजाजकडून प्लॅटिनम प्रायोजकत्व बहाल

पुणे (आरंभ पर्व) : भारतात टेनिस खेळाचे भविष्य आणखी उज्वल करण्यासाठी बजाज समुहाने चेन्नई ओपन टेनिस स्पर्धा-२०२५ साठी प्लॅटिनम प्रोयोजकत्व देत असल्याची घोषणा केली आहे. बजाज समूहाने उचलेले हे पाऊल टेनिसमधील एससारखी बिनतोड सर्व्हिस ठरली आहे. भारतातील उदयोन्मुख टेनिसपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी तमिळनाडू टेनिस असोसिएशन (TNTA) तर्फे टेनिसपटू विकास कार्यक्रमासाठी राबविल्या जात असलेल्या 'द नेक्स्ट लेव्हल' या मोहिमेला पाठबळ देण्यासाठी बजाज ग्रुपने असोसिएशनसोबत भागीदारी केली आहे. भारतातील सर्वाधिक मोठा आणि जुना उद्योगसमूह असलेल्या बजाज समूहाने चेन्नई ओपन-२०२५ स्पर्धेसाठी प्लॅटिनम प्रायोजकत्व देत भारतीय टेनिसक्षेत्र जगात सवोत्कृष्ट पातळीवर झेपावण्यासाठी पुढाकार घेतला आहे. भारतातील होतकरू आणि वेगाने प्रकाशझोतात येत असलेल्या युवा खेळाडूंना वित्तीय आणि पायाभूत सुविधांच्या माध्यमातून सहाय्य दिल्याने टीएनटीएसोबतची ही भागीदारी 'द नेक्स्ट लेव्हल' मोहिमेचा प्रभाव आणखी व्यापक करणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात बजाज समूह चार युवा महिला टेनिसपटूंना सहाय्य प्रदान करणार आहे. भारतातील युवा टेनिसपटूंच्या प्रतिभेला आणखी फुलविण्यासाठी बजाज आगामी काही वर्षांत टीएनटीएच्या साथीने एक व्यापक विकास योजनेला सहाय्य करणार आहे.








# खेड शिवापुर जिल्हा परिषद गट व दोन्ही पंचायत समिती विजयाचा निर्धार!

## खडकवासला भाजपा ग्रामीण अध्यक्ष नवनाथ तागुंदे यांना विश्वास

> "आमदार तापकीर यांनी गेल्या काही वर्षांत विकासाचे नवे पर्व सुरू केले आहे. या कामांमुळे ग्रामीण भागात जनतेचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. आम्ही सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक एकदिलाने काम करून भाजपा उमेदवाराला निश्चित विजयी करू."
> - नवनाथभाऊ तागुंदे, अध्यक्ष खडकवासला भाजपा ग्रामीण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये विधानसभा निवडणुकीनंतर नवचैतन्य निर्माण झाले आहे. आगामी काळात भाजपचा उमेदवार विजयी करायचा या ध्येयाने सर्व कार्यकर्त्यांनी एकजूट होऊन काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. खेड शिवापुर जिल्हा परिषद गट, खेड शिवापुर व खानापूर पंचायत समिती गण या दोन्ही मतदारसंघांमध्ये आमदार भीमराव तापकीर यांच्या नेतृत्वाखाली कोट्यवधी रुपयांची विकासकामे पूर्ण करण्यात आली आहेत. गावागावात रस्ते, पाणीपुरवठा, यांसह अनेक सुविधा उभारण्यात आल्याने जनतेत भाजपा सरकारबद्दल विश्वास आणि आपुलकी वाढली आहे. दरम्यान, खडकवासला मतदारसंघात विविध ठिकाणी भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठका सुरू असून, पुढील निवडणुकांसाठी संघटनात्मक तयारी जोरात सुरू आहे. बारामती दक्षिण जिल्ह्य अध्यक्ष शेखर वडणे आणि आमदार भीमराव तापकीर यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी सर्व पदाधिकाऱ्यांनी "एकजूट राखून खडकवासला मतदारसंघात पुन्हा एकदा कमळ फुलवू" असा भावनिक निर्धार व्यक्त केला.

## हार्मनची रु. ३४५ कोटींची गुंतवणूक



- **कनेक्टेड आणि शाश्वत गतिशीलतेच्या भविष्यात भारताच्या भूमिकेला देणार गती**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स कंपनी लिमिटेडची पूर्ण मालकीची उपकंपनी आणि कनेक्टेड ऑटोमोटिव्ह तंत्रज्ञानातील जागतिक आघाडीची कंपनी असलेल्या 'हार्मन' ने आज पुण्यातील चाकण येथे आपल्या ऑटोमोटिव्ह इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन सुविधेचा विस्तार करण्यासाठी रु. ३४५ कोटी (४२ मिलियन अमेरिकन डॉलर्स) नवीन गुंतवणुकीची घोषणा केली. तात्काळ विस्तारासाठी रु. ४५ कोटी (५.५ मिलियन अमेरिकन डॉलर्स) आणि पुढील तीन वर्षांत प्रगत टेलिमॅटिक्स आणि पुढील पिढीतील ऑटोमोटिव्ह कनेक्टिव्हिटी कार्यक्रमांना पाठिंबा देण्यासाठी अतिरिक्त रु. ३०० कोटी (३६.५ मिलियन अमेरिकन डॉलर्स) यांचा या गुंतवणुकीत समावेश आहे. या नवीन कटिबद्धतेसह २०१४ मध्ये स्थापनेपासून पुण्यातील प्लांटमध्ये 'हार्मन'ची एकत्रित गुंतवणूक आता ५५४ कोटी रुपयांवर (६७ मिलियन अमेरिकन डॉलर्स) पोहोचली आहे. या विस्तारामुळे २०२७ पर्यंत पुण्यात ३०० नवीन नोकऱ्या निर्माण होतील.

**प्रमुख मुद्दे**

- पुण्यातील ऑटोमोटिव्ह उत्पादन प्रकल्पाच्या विस्तारासाठी ३४५ कोटी रुपयांची (४२ मिलियन अमेरिकन डॉलर्स) नवीन गुंतवणूक.
- उत्पादन क्षमता ५०% ने वाढणार.
- विस्ताराचा भाग म्हणून ३०० नवीन नोकऱ्या निर्माण होतील.
- पुढील पिढीतील टेलिमॅटिक्स कंट्रोल 'हार्मन' रेडी कनेक्टचे उत्पादन भारतात होणार.
- २०३० पर्यंत १००% हरित ऊर्जा संक्रमणासह, हरित उत्पादनावर लक्ष केंद्रित.

या विस्तारामुळे भारत सरकारच्या "मेक इन इंडिया, फॉर द वर्ल्ड" या दृष्टिकोनाला बळकटी मिळत आहे. कनेक्टेड आणि शाश्वत मोबिलिटी उत्पादनांच्या प्रगत ऑटोमोटिव्ह उत्पादनासाठी एक प्रमुख जागतिक केंद्र म्हणून भारताला स्थान मिळणार आहे. 'हार्मन' चे सीईओ आणि ऑटोमोटिव्ह विभागाचे अध्यक्ष ख्रिश्चन सोबोट्का म्हणाले, "ही गुंतवणूक भारताप्रति असलेल्या आमच्या कटिबद्धतेचा स्पष्ट संकेत आहे. पुण्यामध्ये केवळ क्षमता वाढत नाही तर ते कनेक्टेड कारचे भविष्य घडत आहे. फाईव्ह जी टेलिमॅटिक्सपासून ते शाश्वत उत्पादनापर्यंत भारताच्या प्रतिभा आणि नाविन्यपूर्णतेच्या सामर्थ्यामुळे तो 'हार्मन'च्या जागतिक ऑटोमोटिव्ह वाढीचा केंद्रबिंदू बनला आहे." 'हार्मन'चा पुण्यातील कारखाना कॉकपिट्स, टेलिमॅटिक्स युनिट्स आणि कार ऑडिओ सिस्टीमसह कनेक्टेड कार तंत्रज्ञानासाठी जागतिक उत्पादन केंद्र म्हणून काम करत आहे. टाटा मोटर्स, मारुती सुझुकी, महिंद्रा आणि महिंद्रा यांसारख्या सर्व भारतीय मूळ उपकरण उत्पादकांना (ओईएम) तसेच युरोप आणि उत्तर अमेरिकेतील निर्यातदार ग्राहकांना तो सेवा पुरवितो.

## रमेश गायकवाड यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

- **जनसेवेला प्राधान्य मानणारा सच्चा कार्यकर्ता म्हणून रमेश गायकवाड यांची ओळख**
- **आ. भिमराव तापकीर यांच्याकडून रमेश गायकवाड यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा.**





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला परिसरातील लोकप्रिय सामाजिक कार्यकर्ते व भाजपा ओबीसी मोर्चा शहर उपाध्यक्ष रमेश बापू गायकवाड यांचा वाढदिवस अत्यंत उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी परिसरातील नागरिक, मित्रपरिवार, समाजसेवक आणि सर्वपक्षीय मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. रमेश गायकवाड यांच्या मनमिळाऊ आणि लोकाभिमुख स्वभावामुळे कार्यक्रमस्थळी गर्दी उसळली होती.

या सोहळ्यात भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य राजाभाऊ जोर,भाजपा शहर उपाध्यक्ष सचिन मोरे, मनसे खडकवासला अध्यक्ष विजय मते, भाजप मंडलाध्यक्ष रुपेश घुले पाटील, प्रदेश ओबीसी मोर्चा सचिव दत्ताभाऊ कोल्हे, मा. सरपंच संतोषदादा मते,सचिन दांगट, सुभाष नाणेकर, सारंग नवले, किशोर पोकळे, सागर भूमकर, शिवसेना ठाकरे गट नेते संदीप मते, सतीश कुटे, राजू कुटे,प्रमोद रायकर, दत्तानाना रायकरदीपक रायकर, तुषार पोकळे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन रमेश बापू गायकवाड मित्रपरिवार यांनी केले होते, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक श्री. राज शिनारे यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते यांनी विशेष परिश्रम घेतले. वाढदिवसाच्या औचित्याने सामाजिक जबाबदारी जपत गायकवाड यांनी गोशाळा व्यवस्थापनाला अकरा हजार रुपयांची मदत केली. त्यांच्या या संवेदनशीलतेचे उपस्थितांनी कौतुक केले.

"वाढदिवस हे फक्त एक निमित्त आहे, समाजकार्याचा नवा संकल्प घेऊन मी पुढे चाललो आहे," असे गायकवाड यांनी भावनिक शब्दांत सांगितले. तसेच त्यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानत दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

रमेश बापू गायकवाड हे खडकवासला परिसरातील जनतेच्या मनात स्थान मिळवणारे, संघर्षातून उभे राहिलेले आणि नेहमी सर्वांच्या सोबत असणारे व्यक्तिमत्व आहे.

त्यांचा वाढदिवस हा केवळ आनंदाचा क्षण नसून समाजसेवेचा एक प्रेरणादायी सोहळा ठरला.

खडकवासल्याचे लोकप्रिय आ. भीमराव तापकीर यांनी रमेश गायकवाड यांच्या घरी सदिच्छा भेट दिली. व वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

रमेश गायकवाड यांनी केलेल्या कार्याची आमदार तापकीर यांनी प्रशंसा केली.यावेळी खडकवासला भाजपा समन्वयक बाळासाहेब नवले,गंगाधर भडावळे उपस्थित होते.

### खडकवासला परिसरातील नागरिकांची मोठी गर्दी

**सामाजिक कार्यकर्ते शहर ओबीसी मोर्चा उपाध्यक्ष रमेश गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त खडकवासला व परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली. रमेश गायकवाड हे त्यांच्या कामामुळे प्रसिद्ध असल्यामुळे त्यांचा मोठा जनाधार असल्याचे यानिमित्त जाणवले. त्यांना शुभेच्छा देण्यासाठी दीपावलीचा सण असतानाही मान्यवरांनी उपस्थिती दर्शवून त्यांच्यावरील प्रेम व्यक्त केले. आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीमध्ये रमेश गायकवाड यांच्याकडे ही सर्वांचे लक्ष असणार आहे. रमेश गायकवाड हे सामाजिक कार्यकर्ते असले तरीही सर्व पक्षांमध्ये त्यांच्याविषयी आकर्षण आहे. ते काय भूमिका घेतील याकडे सर्वांचे लक्ष लागणार आहे.**

# १९८६-८७ च्या बॅचचा नूतन विद्यालयात गेट-टुगेदर कार्यक्रम संपन्न

## ३८ वर्षांनंतर 'नूतन विद्यालय'चे विद्यार्थी पुन्हा एकत्र - भावनिक गेट-टुगेदरला उत्स्फूर्त प्रतिसाद!

**तुषार महाजन**



**शिर्डी (दै. आरंभ पर्व)**

नूतन विद्यालय न्याहळोद येथील १९८६-८७ च्या बॅचचा गेट-टुगेदर कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि भावनिक वातावरणात पार पडला. गेल्या तब्बल ३८ वर्षांनंतर सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनी पुन्हा एकत्र आल्याने आनंदाश्रूंनी सर्वांचे डोळे भरून आले.

कार्यक्रमाची सुरुवात शिक्षकांना पुष्पवर्षाव करून करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या आदरणीय गुरुजनांच्या पायावर लोटांगण घालून आशीर्वाद घेतले. या स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी निवृत्त शिक्षक के. सी. खैरनार होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून बी. जे. रायते, नितीन जैन, आर. डी. वाघ, भदाणे सर, एस. एम. वाघ, जी. एम. पाटील, आरिफ पठाण, माळी सर आदींची उपस्थिती लाभली.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या वेळी थोर नेत्यांना अभिवादन करून दिवंगत विद्यार्थी व देशासाठी बलिदान दिलेल्या सैनिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. ज्या विद्यार्थिनींच्या पतींचे निधन झाले आहे, अशा महिलांना साडी-चोळी देऊन त्यांचा विशेष गौरव करण्यात आला. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःचा परिचय देत जुने दिवस आठवले आणि एकमेकांना आलिंगन देऊन आपुलकीचा भाव प्रकट केला. कार्यक्रम सुरळीत पार पडावा यासाठी विद्यार्थ्यांनी विविध समित्या स्थापन केल्या होत्या —

भोजन व्यवस्था समिती : भारत आबामाळी, हिंमतराव बोरसे, मनोहर जिरे, कांतीलाल, रामकृष्ण उखा जिरे, प्रमोद रोकडे, हिरालाल दगा, संदिप रोकडे, सुदर्शन पाटिल, शशीकांत. यांनी केली.

सुरक्षा समिती : मधूकर वाघ, संजय महाजन, नाना वाडिले, सुनिल वाकडे, सुनिल जिरे, मच्छीद्र फुलपगारे, नितीन गुजर, आला वंजारी, सुदाम जिरे, फुला कोळी.

शांतता समिती : बापू वायरमन, धनराज चौधरी, गोरख रायते, सजीव माळी, संजय जाधव, विनोद पाटिल कौठळ, नाना पाटिल, हरलाल भाऊसाहेब, छोटू जिरे, नरेंद्र जिरे.

नाश्ता व्यवस्था समिती : राजू पाटील, शिवाजी खैरनार, दत्तू पाटिल, नंदराज महाजन, कैलास महाजन, सुधाकर जिरे, रविंद्र माळी, भारत धोबी, रामकृष्ण भोगे, रत्नाकर पवार.

शिक्षक व पाहुणे व्यवस्था समिती : अमृत वाघ, राजेश माळी, ईश्वर रोकडे, धनराज महाजन, युवराज चौधरी, विनोद पोतदार, शांतीलाल डॉक्टर, सुभाष निकम, अनंतकुमार पंचभाई, पुनमचंद पाटील.

या भावनिक सोहळ्यात शोभा महाजन, प्रमिला वाघ, शोभा घरटे, कल्पना वाघ, निर्मला वाघ, निर्मला भदाणे, अलका कोठावदे, वैशाली माळी, किरण बच्छाव, छाया शेटे, ललिता पाटील, भिकू कोळी आदींनी सक्रिय सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन संदीप रोकडे यांनी केले. त्यांच्या नियोजनामुळे संपूर्ण स्नेहसंमेलन सुरळीत आणि शिस्तबद्धरीत्या पार पडले.

या सर्व समित्यांनी जबाबदारीने आपापले काम पार पाडल्याने कार्यक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पूर्ण झाला. शेवटी सर्व मित्रांनी "जय श्रीराम" चा जयघोष करत एकमेकांना पुन्हा भेटण्याचे आश्वासन दिले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.